**सुधारित विकास योजना — नागपूर**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र.टिपीएस-२४१५/२४२/प्र.क्र.१३७/२०१५/नवि-९**
**मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.**
**दिनांक:** २० नोव्हेंबर, २०१५

**शासन निर्णय** :- सोबतची अधिसूचना (मराठी / इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

( रा. शा. चौहान )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
४) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
५) जिल्हाधिकारी, नागपूर.
६) सह सचिव (नगररचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.
८) सहायक संचालक नगररचना, नागपूर शाखा, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या ०५ प्रती शासनास विहीत मार्गाने सत्वर सादर कराव्यात.)
९) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे पाठवाव्यात.)
१०) कक्ष अधिकारी, (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.)
११) निवडनस्ती (कार्यासन नवि-९)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.**
**दिनांक - २० नोव्हेंबर, २०१५.**
**अधिसूचना**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**क्रमांक:टिपीएस-२४१५/२४२/प्र.क्र.१३७/२०१५/नवि-९** : ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-२४९६/२६४३/प्र.क्र.३००(अ)/९७/नवि-९, दि. ७ जानेवारी, २००० अन्वये मंजूर झाली असून ती दि. १ मार्च, २००० पासून अंमलात आली आहे तसेच दुसरी अधिसुचना क्र. टिपीएस-२४००/१६२८/प्र.क्र.२००/२०००/नवि-९, दि. १० सप्टेंबर, २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दि. २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजा नागपूर येथील नगर भूमापन क्र. १०४ (भाग) शिट क्र. २७४, २९० मधील क्षेत्र ४०१३.३७ चौ.मी. (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे) ही जागा रेशीमबाग खेळाचे मैदान म्हणून निर्देशित केलेली आहे. (यापुढे "उक्त निर्देशित जागा" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका यांनी, नियोजन प्राधिकरण म्हणून, त्यांच्या सर्वसाधरण सभेचा ठराव क्र. ४००, दि. ३०/१०/२००९ नुसार, उक्त जागा रेशिमबाग खेळाचे मैदान या उक्त निर्देशित जागे मधून वगळून मुक्त होणारी जागा सार्वजनिक निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याचे अनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (१) मध्ये नमुद वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त फेरबदलाचा प्रस्ताव (यापुढे "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढील प्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजुरीची अधिसुचना सुधारित करण्यात येत आहे.

"उक्त विकास योजना मंजुरीच्या दि. ७ जानेवारी, २००० च्या अधिसुचनेच्या फेरबदल सुचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे —

**नोंद**

"मौजा नागपूर येथील नगर भुमापन क्र. १०४(भाग) शिट क्र. २७४ व २९० या मधील सुमारे ४०१३.३७ चौ.मी. जागा रेशिमबाग खेळाचे मैदान यामधून वगळण्यात येत असून मुक्त झालेली जागा, नकाशात दर्शविल्यानुसार, सार्वजनिक निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्यात येत आहे"

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना / भाग नकाशा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्या कार्यालयात, नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात येत आहे.

सदर अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

(रा. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

URBAN DEVELOPMENT DEPTT MANTRALAYA, MUMBAI-32

C:\Backup\2014-2015\Kalam\Kalam 37\Reshimbag-37.docx

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai – 400 032.**
**Date – 20th November, 2015.**

**NOTIFICATION**

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

No.TPS-2415/242/CR-137/2015/UD-9:- Whereas, Revised Development Plan of Nagpur Municipal Corporation has been sanctioned by the Government vide Urban Development Department Notification No.TPS-2496/2643/CR-300(A)/97/UD-9, dated the 7th January, 2000 and Notification No. TPS-2400-1628-C.R.200-2000/UD-9, Dated 10th September, 2001 and has come into force with effect from the 1st March, 2000 and 21st September, 2001 respectively (hereinafter referred to as the said "Development Plan") under section 31 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") ;

And whereas, in the said Development Plan, land admeasuring 4013.37 sq.mt. bearing CTS No. 104(pt.), sheet No. 274, 290 of Mouje Nagpur (hereinafter referred to as "the said land") is designated as "Reshimbag Play Ground" (hereinafter referred to as "the designation") ;

And whereas, the Nagpur Municipal Corporation being Planning Authority vide its General body resolution No. 400, dt. 30/10/2009 has resolved to delete the said land from the said designated and to include land thus released in public and semi-public zone and accordingly submitted the proposal of modification after following procedure as laid down under section (1) of section 37 of the said Act. ( hereinafter referred to as "the proposed modification")

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that the proposed Modification should be sanctioned ;

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub section (2) of section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated the 7th January, 2000 as follows ;

"In the Schedule of Modifications appended to the Notification dated 7th January, 2000, sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry –

**ENTRY**

"The land admeasuring approximately 4013.37 sq. mt. and bearing CTS No. 104 (pt) sheet No. 274 and 290 of Mouja Nagpur is deleted from "Reshimbag Play Ground" and land thus released, is included in public semi-public zone, as shown on the plan" ;

A copy of the Notification, along with the part plan of aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Commissioner, Nagpur Municipal Corporation during office hours on all working days.

This Notification shall also be available on the Government web site www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

( R. S. Chouhan )
**Section Officer to Government**